**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१५**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :-४/२/२०१२

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१५ गुरूवार दि.०९/२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक- ०९/२/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे मा.आयुक्त सो. सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ. |

सही /-

प्र. नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १५**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-८३ | गुरूवार दिनांक ०९/२/२०१२ |
| ठराव क्रमांक-८३ | गुरूवार दिनांक ०९/२/२०१२ |

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे मा.आयुक्त सो. सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) विचारार्थ.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर
जा.क्र.अर्थ / अंदाजपत्रक /७१६/१२ दिनांक ४/०२/२०१२

**विषय :-** सन २०११-२०१२ चे सुधारित व सन २०१२-२०१३ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०११-२०१२ चे सुधारित व सन २०१२-२०१३ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक ०९/०२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी, ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त श्री. संजय काकडे सो. यांचे पत्र

--**--

मा.स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ०९/०२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत ,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा.सभापती साहेब यांनी मा.आयुक्त श्री.संजय काकडे सो. यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवुन स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

**मा.आयुक्त श्री. संजय काकडे :-** मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी व उपस्थित पत्रकार बंधु यांचे सभेमध्ये स्वागत करतो. मी आज सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) मा. स्थायी समिती कडेस मंजूरी करिता सादर करीत आहे. त्यास मा.स्थायी समितीने व महासभेने मंजूरी द्यावी. सदर अंदाजपत्रक मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी सभेचे आयोजन करणे विषयी मी दिनांक ४/२/२०१२ रोजी मा.सभापती, स्थायी समिती यांना पत्र दिले होते. सभापती स्थायी समिती , उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्य यांचे स्वागत करतो. मी आज सन २०१२-२०१३ चा अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांच्याकडे सादर करीत आहे.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणारे महानगरपालिकेचा अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करते.

यानंतर मा.आयुक्तसाहेब यांनी अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त केले तद्नंतर मा.सभापती साहेब यांनी मा.स्थायी समितीकडेस सादर झालेल्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे करिता मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १०/०२/२०१२ रोजी सुरू होईल असे सुचित केले.

मा.स्थायी समितीची गुरूवार दिनांक ९/०२/२०१२ रोजी बोलावलेली व पुढे शुक्रवार दिनांक दिनांक १०/०२/२०१२ व शनिवार दिनांक ११/०२/२०१२ रोजी चालू असलेल्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

--**--

**चर्चा :-**

**मा.सभापती साहेब :-** आज सकाळी ११-०० वाजता मा.स्थायी समितीची सभा बोलाविण्यांत येवुन अंदाजपत्रकाच्या प्रती सर्व मा. सदस्य यांना देण्यांत आलेल्या आहेत. यावर मा.सदस्य यांनी अभ्यास करावा व दुपारी ४.०० वाजता सभेपुढील कामकाज सुरू होईल असे सुचित केले.

**प्रस्ताव क्रमांक - १** अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन दल नाहरकत प्रमाणपत्र फी वाढविणे.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** सदरचा विषय ऑफिस रिपोर्ट प्रमाणे मंजूर करणेत यावा.

**प्रस्ताव क्रमांक - २ -** अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणे

**मा.श्री. सातपुते दि.ना.:-** सदरचा विषय ऑफिस रिपोर्ट प्रमाणे मंजूर करणेत यावा.

**मा.श्री. लोंढे सु.सो.:-** महानगरपालिका हद्दीमध्ये अग्निशमन कर लागू करणे बाबत मा.शासनाचे परिपत्रक आहे काय ?

**अग्निशमन अधिक्षक-श्री.मिसाळ :-** महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ हा दिनांक २ डिसेंबर २००८ पासुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करण्यांत आलेला आहे. महानगरपालिकेच्या चारही झोनमध्ये अग्निशमन यंत्रणा सुसज्जपणे राबविणे करीता निधीची आवश्यकता भासणार असल्याने सदरचा कर लागू करणे आवश्यक आहे. ५ % कर केला तर महानगरपालिकेस अंदाजे २ कोटी ६० लाख उत्पन्न अपेक्षित आहे.

**मा.श्री. डागवाले कि.आ./ मा.श्री. सातपुते दि.ना. :-** करयोग्य मूल्यांवर अग्निशमन कर १ % टक्का करावा. व तरतूद ५३ लाख करण्यात यावी.

**प्रस्ताव क्रमांक - ३ -** मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत..

**मा.श्री. डागवाले कि.आ.:-** यापुर्वी मालमत्ता हस्तांतरण नोंदणी किती टक्क्याने केलेली आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** मालमत्ता हस्तांतरण कर आकारणी पासुन महानगरपालिकेस किती उत्पन्न झाले आहे.

**श्री.झिने :-** सन २०११-२०१२ या वर्षापासुन ०.५० टक्के या दराप्रमाणे किंमतीवर नाव नोंदणी शुल्काची आकारणी सुरु केलेली आहे. त्यानुसार जानेवारी २०१२ अखेर अंदाजे रु. ७२.०० लाख इतकी नांव नोंदणी फी वसुल झालेली आहे. उर्वरीत दोन महिन्यांत अंदाजे ९०.०० लाख होईल.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** मालमत्ता हस्तांतरण नांव नोंदणी करीता ०.५० टक्के वाढविण्यांत यावेत.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** मागील वर्षी आकारण्यांत आलेले ०.५० टक्के व आत्ताचे ०.५० असे दोन्ही मिळुन १ टक्का करावी.त्याची तरतूद १ कोटी ८० लाख करण्यात यावी.

**प्रस्ताव क्रमांक - ४ :-** नविन वृक्ष उपकराची आकारणीबाबत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** वृक्ष उपकर १ टक्का केला तर त्यापासुन मिळणारी रक्कम स्वतंत्र बँक खात्यात ठेवावी. त्यांचा उपयोग फक्त महानगरपालिका हद्दीत वृक्ष लागवड करुन ते जतन करण्यासाठीच वापरण्यांत यावा. इतर कामाकरीता या खात्यावरील पैसे वर्ग करण्यांत येवू नये.

**मा.श्री. भोसले ग.पुं.:-** यापुर्वी महानगरपालिके मार्फत अनेकवेळा वृक्ष लावगवडीचा कार्यक्रम करण्यांत आलेला आहे. त्यापैकी आज सद्यस्थितीत एकही झाड राहिलेले नाही. वृक्ष लागवडीच्या नावाखाली अमाप पैसा खर्च होत आहे त्याचा काहीही उपयोग होत नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** महानगरपालिके मार्फत लावण्यांत आलेल्या झाडांचे जतन करणेकरीता पाण्याचा एक स्वतंत्र टँकर चालू करण्यांत यावा. त्यावर सक्षम कर्मचारी यांची नेमणुक करण्यांत यावी.

**प्र.उदयान विभाग श्री.मिलींद वैद्य :-** शासकीय परिपत्रकानुसार आपल्या महानगरपालिकेस २५ हजार वृक्ष लागवडीचे उद्दीष्टय देण्यांत आलेले आहे.

**मा.श्री.भोसले ग.पुं. :-** मागील वेळी किती वृक्ष लागवड करण्यांत आलेली आहे.

**प्र. उदयान विभाग श्री.मिलींद वैद्य :-** अंदाजे १००० चे आसपास वृक्ष लागवड करण्यांत आली आहे. वृक्ष लागवडीवर आजपर्यंत ४,७४,०००/- खर्च करण्यांत आलेला आहे.

**मा.श्री.लोंढे सु.सो. :-** नगर शहराचे ४ झोन करण्यांत यावेत. प्रत्येक झोनमधील वृक्ष लागवडी करीता चार तज्ञांना मानधनावर घेण्यांत यावे.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :-** सध्या अस्तित्वात असलेल्या चार झोन मधील चारही प्रभाग अधिका-यांना वृक्ष लागवडीचे उद्यीष्टय देवुन त्यांना त्याकरीता चार टँकर देवू त्यासाठी चार अतिरिक्त कर्मचारीही देवू मागील वेळी ७०० झाडे लावले होते. त्यातील काही झाडांना ट्रीगार्ड लावुन घेतलेले आहेत. पण त्या झाडांना पाणी देण्यासाठी तरतुद केलेली नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** वृक्ष लागवडीचे काम खाजगी तत्वावर देण्यांत यावे.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :-** शहरात वृक्ष लागवड करणे करीता खाजगी एजन्सीची नेमणुक करणे बाबतचा विषय वृक्षप्राधिकरण समितीमध्ये घेण्यांत आलेला होता. पण त्यास नागरीकांचा प्रतिसाद मिळालेला नाही. वृक्ष करा बाबतचे स्वतंत्र बँक खाते ठेवणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना पत्रही देण्यांत आलेले आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. / मा.श्री.लोंढे सु.सो. :-** वृक्ष उपकर अर्धा(१/२ टक्के) ऐवजी १ % (एक टक्के) टक्क्याने आकारण्यांत यावा.

**प्रस्ताव क्रमांक - ५ -** जललाभ कर व मललाभ कर आकारणीबाबत.

**मा.श्री.लोंढे सु.सो. /मा.श्री.जगताप नि.वि.:-**ऑफिस रिपोर्ट नुसार विषय नियमानुसार मंजूर करणेंत यावा. जललाभ कर व मललाभ कर प्रत्येकी २५ लाख वाढविण्यात यावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात येत असल्याने तरतूदी वाढविणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव क्रमांक - ६ -** कोंडवाडा केल्यानंतर आकारण्यांत येणा-या कोंडवाडा दरात वाढ करणेबाबत.

**मा.श्री.डागवाले कि.आ./मा.श्री. सातपुते दि.ना.:-** महानगरपालिकेच्या कोंडवाडयासाठी जागा आहे काय ? आणि सध्या कोंडवाडा केला जातो का ?

**श्री.गोयल :-** महानगरपालिकेच्या वडगांव पंपिंग स्टेशन येथे कोंडवाडयासाठी जागा निश्चित करण्यांत आलेली आहे. सदर जागेस सध्या वॉल कंम्पौंड नसल्याने कोंडवाडा केला जात नाही. त्याठिकाणी कोंडवाडयाचे बांधकाम चालू आहे. थोडयाच दिवसात बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कोंडवाडा सुरू केला जाईल.

**मा.श्री. भोसले ग.पुं.:-** चाँदसुलताना हायस्कुल जवळ असणा-या कचरा कुंडीवर मोकाट जनावरे फिरतांना अनेक वेळा आढळुन आलेले आहेत. तेथील जनावरांचा कोंडवाडा करणे बाबत अनेकवेळा सांगुनही सदरची जनावरे आजपर्यंत पकडलेली नाहीत.

**श्री.गोयल :-** सदर जनावरांच्या मालकांना मोकाट जनावरे न सोडण्या बाबत सक्त सूचना दिलेल्या आहेत.

**मा.श्री.जगताप नि. वि. :-** कोंडवाडा केल्यानंतर आकारावयाचे दर जास्त वाटतात. गाय वासरु बकरी यांचे सुचविलेले दरात ५०% कपात करणेंत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** दर वाढ तक्तामधील अ.नं. १ व २ मंजूर, अ. नं. ३,४ व ५ मधील दर ५०% रकमेचे कमी आकारणेत यावे.

**<u>प्रस्ताव क्रमांक :- ७</u>** खाजगी सेप्टीक टँक सफाई सेवेचे खाजगीकरण करणेबाबत.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** ऑफिस रिपोर्ट नुसार प्रस्ताव खाजगी करणातुन कार्यवाही करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून मा.स्थायी समितीपुढे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत यावा.

**<u>उत्पन्न बाजू ........</u>**

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** महानगरपालिका हद्दीत असणा-या मालमत्तांचे गेल्या १० वर्षापासुन रिव्हीजन झालेले नाही. कित्येक मालमत्ता रिव्हीजन करतेवेळी सुटलेल्या आहेत. नविन झालेल्या बांधकामावर अद्यापही कर आकारणी केली जात नाही.

**मा.श्री.डागवाले कि.आ./ मा.श्री. भोसले ग.पुं.:-** उपनगरातील भागात कित्येक नविन बांधकामे होवुन तेथे त्यांचा वापर चालू आहे. महानगरपालिके मार्फत त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतु त्यांचेवर अद्यापपर्यंत कर आकारणी केलेली नाही. सर्व मालमत्तांची पुन्हा फेर रिव्हीजन करण्यांत यावे. त्यापासुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठी भर पडेल. सर्जेपुरा भागातील काही भाग आजही कर वसुली पासुन मुक्त आहे. अद्यापपर्यंत तेथे कर आकारणी केली गेलेली नाही.

**प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.३-श्री.वर्मा के.सी. :-** सर्जेपुरा भागात वॉर्ड क्रमांक ४२ अंतर्गत येणारा जो काही भाग आहे. त्या भागाचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. त्या भागात अंदाजे ५ हजार ते ७ हजार मालमत्ता आहेत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** सिव्हील हडको भागातही अद्यापपर्यंत कर आकारणी केली गेलेली नाही.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :-** वॉर्ड क्रमांक ४२ चे फेर रिव्हीजनचे काम सुरु केलेले आहे.

**प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.३ श्री.के.सी.वर्मा :-** वॉर्ड क्रमांक ४२ चे काम ७ महिन्यापासुन चालू केलेले आहे. अंदाजे ४० टक्के पर्यंत काम झालेले आहे. रेकॉर्ड हरविलेले आहे. सन २००३-२००४ पासून आकारणी नाही. सिध्दार्थनगर-लालटाकी हडकोचा काही भाग ४ ते ५ हजार घरावर आकारणी झालेली नाही.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** चालू दरानुसार कर आकारणी करण्यांत यावी. प्रत्येक वॉर्डात फिरणा-या केअर टेकर यांना वॉर्डाची संपुर्ण माहिती असते त्यांचेकडे अशा प्रकारची कामे देण्यांत यावीत.

**प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१-श्री.तडवी :-** सावेडी विभागातील ज्या मालमत्तांचे रिव्हीजन राहिलेले आहे. अशा ठिकाणी रिव्हीजन करण्याचे काम चालू आहे. ज्या ठिकाणी रिव्हीजन झालेले नाही. तेथे दुप्पट दराने आकारणी करुन वसुली केलेली आहे.

**मा.उपायुक्त(कर) सौ.झगडे मॅडम :-** सावेडी भागामध्ये शासकीय कार्यालये मोठया प्रमाणावर आहेत. अशी शासकीय कार्यालये महानगरपालिकेचा कर भरत नाहीत. शासकीय कार्यालयांकडुन येणारा कर तीन ते चार कोटी आहे. मा. शासनाकडे याबाबत प्रश्न प्रलंबित आहे. मा.कोर्टाकडे प्रलंबित असलेल्या केसेस पोटी ७ ते ८ कोटींचे येणे आहे. भांडवली मुल्यांवर कर आकारणी करणे बाबतचा विषय प्रगती पथावर आहे. सदरचा विषय मनपा सभेपुढे घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.डागवाले कि. आ. :-** ब-याच ठिकाणी मालमत्ता अशा सोडून दिलेल्या आहेत त्यांचे रिव्हीजन तातडीने घेणे गरजेचे होते. या करिता भांडवली मुल्यानुसार कर आकारणी बाबत निर्णय होई पावेतो पुर्वीचया पध्दतीने मालमत्तेचे पुर्णर्मुल्याकंन करणेत यावी. त्यामुळे उत्पन्नात भरीव वाढ होईल. मागील सलग दोन वर्षे ५२ कोटी ची तरतुद करण्यात आलेली होती. मात्र यावेळी अंदाजपत्रक सादर करताना सुमारे ४२ कोटी तरतूद धरण्यात आलेली आहे. याकरिता सदरची

तरतूद ४९ कोटी करण्यात यावी. अग्निशमन कर ५ टक्के जास्त होत आहे. याकरिता तो करयोग्य मुल्याच्या १ टक्का करण्यात यावा.

**मा.सौ.शिंदे र.अ. :-** सर्वसाधारण कर ४९ कोटी तसेच अग्निशमन प्रस्तावास मंजूरी दिलेली असल्याने ती तरतूद ५३ लाख करण्यात यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं :-** उपनगरात नवीन बंगले, कॉलनी यांना आकारणी नाही. जुने घरे पाडून दुकाने बांधली आहेत त्याबाबत व्यापारी दराने आकारणी केलेली नाही. ती करण्यात यावी.

**मा.श्री.लोंढे सु.सो. :-** हद्द वाढीच्या भागात ज्या नविन वसाहती झालेल्या आहेत. अशा वसाहतींमध्ये आपण संपुर्ण पणे सुविधा उपलब्ध करुन देवू शकत नाही. त्यांना महानगरपालिके मार्फत आकारण्यांत येणा-या करात सवलत देण्यांत यावी.

**मा.उपायुक्त (कर)सौ. झगडे मॅडम :-** ज्या नविन विकसित भागांमध्ये महानगरपालिका अद्याप सोयी सुविधा देवू शकत नाही. अशा वसाहतींची यादी आलेली आहे. त्यावर अद्याप निर्णय घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.लोंढे सु.सो.:-** करात सवलत देण्याचा लवकर निर्णय घ्यावा. नगर - कल्याण रोडवर विद्या कॉलनी या भागात महानगरपालिके मार्फत सुविधा दिल्या जात नाहीत.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-** वसुली विभागाकडील सर्व साधारण करापासुन येणे (सन २०१२-२०१३) ४९ कोटी करण्यांत यावेत.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** महानगरपालिका हद्दीत आकारण्यांत येणारा घनकचरा कर हा सर्व साधारण टपरी वजा असणारे घर आणि अलिशान कोहीनूर सारखे कापड दुकान या दोन्हींकडुनही एकच कर आकारला जातो. घरकचरा कर हा स्क्वेअर फुटावर आकारण्यांत यावा.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ.महेश डोईफोडे :-**मालमत्तांचे रिव्हीजन करतेवेळी सदर कर वसुली बाबत दुरुस्ती करता येईल. याबाबत स्वतंत्र प्रस्ताव रिव्हीजन विभागाने दयावा.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** घनकचरा कर आकारणेबाबत नवीन पध्दती अमलात आणणे पुर्वी महासभेत प्रस्ताव ठेवनुच निर्णय घेणेत यावा.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** महानगरपालिका मालकीचे माळीवाडा भागातील सौभाग्य सदन मंगलकार्यालयाचा जनावरे बांधण्यासाठी गोठा म्हणुन उपयोग केला जात आहे. महानगरपालिकेस त्यापासुन अपेक्षित उत्पन्न मिळू शकत नाही. याकरिता महानगरपालिकेच्या पॅनल आर्किटेक्ट यांचे पैकी एकाची नेमणुक करून नुतनी करणाचा प्लॅन एस्टीमेंटसह रिपोर्ट तयार करावा या कामाकरिता २ वर्षापुर्वी महासभेचे मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे वेगळया ठरावाची गरज नाही. परंतु त्याबाबत अद्याप पावेतो उत्पन्नाची बाब असुनही प्रशासनाने लक्ष दिले नाही त्वरीत प्रस्ताव तयार करावा. तसेच खाजगीकरणातुन घेणा-यास नुतनीकरणाच्या खर्चासह सदर मंगलकार्यालय खाजगी तत्वावर चालविण्यासाठी दिल्यास त्यापासुन उत्पन्न मिळू शकते. खाजगी तत्वावर देणे बाबत प्रस्ताव ठेवणे बाबत कार्यवाही करावी. अशी शिफारस आहे.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** महानगरपालिका हद्दीत असणारे गाळे त्यांचे भाडे व हस्तांतरणा बाबत व त्यामध्ये असणारे पोट भाडेकरु यांचे बाबत काय कार्यवाही केली. तसेच अंदाजपत्रकामध्ये सन २०११-२०१२ चे मंजुरी देताना महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तातंरण करणेकामी रूपये १ लाख प्रती गाळा याप्रमाणे गाळे हस्तातंरण केल्यास फी घेण्याचा निर्णय घेणेत आला.त्यानुसार गेल्या वर्षात कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे उत्पन्न बुडत आहे. याबाबत तातडीने कामकाज सुरू करणे.

**मा.उपायुक्त (कर)सौ.झगडे मॅडम :-** महानगरपालिका हद्दीत असणा-या गाळयांपैकी काही गाळयांचे हेअरिंग झालेले आहे. एकुण १११८ गाळे आहेत. हेअरिंगची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर पोटभाडेकरु व भाडया संदर्भात निर्णय घेता येईल.

**प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२-श्री.साबळे:-** दिल्लीगेट गाळे पाडल्यामुळे या वर्षी होणारी गाळे भाडे वसुली कमी होणार आहे.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** गुंठेवारी विकास नियमित करणे यामध्ये रक्कम रु.१०.०० लाख वाढविण्यांत यावेत. जाहिरात बोर्ड जागा भाडे रक्कम रु. ५.०० लाख वाढविण्यांत यावेत.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** बंद पडलेली गुंठेवारी कधीपासुन चालू करणार आहात.

**श्री. प्रभुणे :-** गुंठेवारी लवकर सुरू होईल.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** गुंठेवारी करणेकरीता स्वतंत्र विभाग तयार करणेंत यावा. नगररचना विभागातील कर्मचा-यांना हे काम देण्यांत येवू नये.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :-** गुंठेवारी हि मा.शासनाने बंद केली असुन मा.शासनाचे पत्र आल्यानंतर ती चालू करण्यांत येईल.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** गुंठेवारीचे काम लवकरात लवकर सुरू करावे.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-**महानगरपालिकेच्या मालकीच्या महावीर कलादालन प्रमुख यांचे कामकाज उदासीन आहे. मा. शासनाच्या वाचनालय बांधकाम तसेच वाचनालय साहित्याकरिता अनेक योजना आहेत. त्यानुसार मागणी का केली जात नाही. कारण केडगाव वाचनालयास अनुदान मिळते.महावीर कलादालनास मा.शासनाचे अनुदान नाही काय ? सर्व वाचनालयांना अनुदान मिळणे बाबतचा प्रस्ताव पाठविणेंत यावा.

**मा.उपायुक्त(सा)डॉ.महेश डोईफोडे:-** मा.शासनाच्या नियमानुसार महानगरपालिकेच्या एका वाचनालयास शासकीय अनुदान प्राप्त होते. आपल्या केडगांव येथील अंबिका वाचनालयास शासकीय अनुदान प्राप्त होत आहे.

**मा.सभापती साहेब :-** शाळा भाडयापासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ करण्यासाठी भाडयामध्ये वाढ करण्याचा स्वतंत्र प्रस्ताव ठेवावा.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** महानगरपालिकेने ज्या शाळा भाडयाने दिलेल्या आहेत अशा शाळांकडुन भाडे वसुली करणे करीता त्यांना सील करण्याची कार्यवाही सुट्टीच्या दिवशी करणेंत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** शहरातील रस्ता काही कामानिमित्त फोडावा लागला तर संबंधितांकडुन रितसर पैसे भरुन घेणेत यावेत. सदरचे पैसे फोडलेल्या त्याच रस्त्यावर खर्च करुन रस्ता पुर्ववत करणेंत यावा. रस्ता फोडण्यापासुन मिळणारे उत्पन्ना करीता स्वतंत्र बँक खाते निर्माण करण्यांत यावे. रस्ता फोडणे -जोडणे वसुली व बांधकाम इतर या हेडवर ५०.०० लाख वाढविण्यांत यावेत.  महापौर दुर्धर रोग निवारण निधी रक्कम रु.१५.०० लाख ठेवण्यांत यावा.

पुर्वीप्रमाणे सर्व रोगांच्या शस्त्रक्रीयेसाठी सदर निधी देण्यांत यावा. मालमत्ता पुर्नमुल्यांकना करिता ठेवण्यात आलेला निधी रक्कम रू. ५० लाखाने कमी करण्यात यावा.

**मा.उपायुक्त(सा) डॉ.महेश डोईफोडे :-** जी.आय.एस.प्रणाली नुसार मालमत्तांचे पुनर्मुल्यांकन करावयाचे असल्याने सदर कामी ठेवण्यांत आलेला निधी कमी पडणार असुन त्यामध्ये वाढ करावी लागेल.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** बजेटमध्ये दर्शविल्या प्रमाणे तरतुद ठेवण्यांत यावी.

**मा.श्री. डागवाले कि.आ.:-** विद्युत साहित्य खरेदी करणे कामी रक्कम रु.३०.०० लाखाची तरतुद करणेत यावी. प्रशासकीय सुरक्षा व्यवस्था या लेखाशिर्षाची तरतूद रू.५ लाखाने कमी करण्यात यावी. तसेच शिल्लक रकमेतून बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथेही सुरक्षा रक्षक नेमण्याची कार्यवाही करावी.

**मा.श्री. सापतुते दि.ना.:-** केडगांव विभागाकरीता एक अग्निशमन वाहन खरेदी करणे बाबत तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** सावेडी विभाग व केडगांव विभागाकरीता गाडी खरेदी करणे बाबत प्रस्ताव ठेवणेत यावा.

**अग्निशमन अधिक्षक-श्री.मिसाळ :-** अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत चार वाहने चालू आहेत. पैकी एक किरकोळ कामाकरीता बंद अवस्थेत आहे.

**मा.श्री. सातपुते दि.ना.:-** फायर फायटर कडील वाहने त्वरीत दुरुस्त होतील याबाबत दक्षता घेणेत यावी. रक्कम रु.दोन हजार तीन हजार करीता महिना - महिना वाहने बंद पडतात.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** किरकोळ तातडीच्या दुरुस्ती करीता निधी स्वतंत्र ठेवण्यांत यावा. अग्निशमन कर बसविणेत येणार असल्याने वाहन सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

**मेकॅनिकल इंजि. श्री.निकम पी.जे. :-** रक्कम रु.७०.०० हजार किरकोळ दुरुस्ती करीता आहेत.

**मा.श्री. सातपुते दि.ना.:-** केडगांव विभागाकरीता स्वतंत्र फायर स्टेशनचे बांधकाम केले त्यावेळी गाडी खरेदीची तरतुद का केली गेली नाही. केडगांव विभागाकरीता कर्मचारी का मिळत नाहीत.

**अग्निशमन अधिक्षक-श्री.मिसाळ :-** संपुर्ण फायर फायटर विभागाकडे एकुण ४२ कर्मचारी आहेत. सावेडी विभाग शहर विभाग व केडगांव विभाग सुरु करावयाचा असल्यास तीनही शिफ्ट मिळुन कर्मचारी उपलब्ध होत नाहीत.

**मा.श्री.भोसले ग.पुं. :-** आस्थापना विभागाकडून सॅर्क्युलर काढावे. फायर फायटर विभागाकडील कोर्स करिता कर्मचारी पाठवावेत अशा कर्मचा-यामुळे संख्या वाढेल. बरेच दिवसात अशी कार्यवाही झालेली दिसत नाही.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-**सावेडी विभागाकरीता अग्निशमन वाहन खरेदी बरोबर केडगांव विभागाकरीताही एक नविन अग्निशमन वाहन खरेदी करण्यांत यावे. महानगरपालिके मार्फत बसविण्यांत आलेले सोलर पथदिवे कोठे कोठे बसविण्यांत आले आहेत. व ते सद्यस्थितीत चालू आहेत काय.

**मा.श्री.शेंडगे :-** सोलर पथदिवे महालक्ष्मी उद्यान, अमरधाम येथे बसविणेंत आलेले होते. सर्व दिवे बंद स्थितीत आहेत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** सोलर पथदिवे कामी दर्शविण्यांत आलेली तरतुद कमी करुन २.०० लाखाने ठेवण्यांत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणेबाबतचा ठेका यापुर्वी देण्यांत आलेला होता. संबंधितांनी पुर्ण काम केलेले आहे. त्यांचेवर दंडात्मक कारवाई केली आहे काय ?

**श्री.वाघ सी.एस.आय :-** संबंधित ठेकेदारावर काम पूर्ण नाही केल्याबाबत दंडात्मक कारवाई करण्यांत आलेली आहे.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** कचरा संकलन करणे बाबत संपुर्ण शहराचा प्रस्ताव न करता झोन नुसार प्रस्ताव करणेंत यावेत. सदर कामासाठी करण्यांत आलेली तरतुद रक्कम रु.२.४० कोटी करण्यांत यावेत. कंटेनर खरेदी करणे कामी रक्कम रु.१५.०० लाख करणेत यावी.

**मा.श्री. डागवाले कि.आ./ मा.श्री. भोसले ग.पुं. :-** उपनगरामध्ये नवीन स्मशानभुमी विकसीत करणेत यावी. गारेगरीब लोकांकडे दुर्घटना घडल्यास अमरधाम खुप लांब पडते खर्चीक होते.

**मा.सभापती साहेब :-** उपनगरात नवीन स्मशानभुमी बाबत तातडीने कार्यवाही करावी. कारण याबाबत वारंवार सभेमध्ये चर्चा होते. प्रत्यक्ष कार्यवाही होत नाही.तसेच नवीन शववाहिका खरेदी करणे बाबत तातडीने कार्यवाही करण्यांत यावी. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये होणा-या विविध कार्यक्रमाकरिता आधुनिक नविन फिरते शौचालय खरेदी करणे गरजेचे आहे. त्याकरिता रू. १० लाखाची तरतूद करण्यात यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** केडगांव ,स्टेशन रोड परिसर, एकता कॉलनी, ताराबाग कॉलनी, भूषणनगर तसेच स्टेशन रस्ता परिसर, अरणगांव रोड परिसर या भागातील महिला रूग्णांना प्रसुतीकामी महानगरपालिके मार्फत या परिसराच्या दृष्टिने रूग्णालय नसल्याने गैरसोय होते. याकरिता जेंडर बजेट महिला व बालकल्याण कार्यक्रम खर्च ५% प्रमाणेची तरतूद रूपये ३ कोटी ९६ लाख केलेली आहे.त्या निधी मधून केडगांव व परिसर उपनगरामध्ये प्रसुती गृह व बालरुग्णालय इमारत बांधणे करिता १ कोटीची तरतुद करण्यांत यावी. व कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना नुतनीकरण व आवश्यक बांधकाम तसेच अद्यावत प्रसुतीगृह याकामी १ कोटीची तरतूद करण्यात यावी. तसेच सावेडी उपनगर परिसरात महिलांसाठी लेडीज जीम इमारत व मशिनरी साठी रक्कम रु.५०.०० लाखाची तरतुद करणेत यावी.

**मा.सभापती साहेब :-** जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम खर्च ५% चे तरतुदी मधून उपनगरात प्रसुती गृह व बालरूग्णालय करणे बाबत १ कोटीची तरतुद व कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना नुतनीकरण व अद्यावत प्रसुतीगृह याकामी १ कोटीची तरतूद करण्यात यावी. तसेच महिलांसाठी करावयाच्या व्यायाम शाळेसाठी रक्कम रू.५०.०० लाखची तरतुद करण्यास शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** अपंग पुनर्वसन योजना ३% निधी बाबत माहिती देण्यांत यावी.

**आरोग्य वै. अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** अपंग पुनर्वसन योजने अंतर्गत कुठलिही योजना राबविण्यांत आलेली नाही. या निधीतुन कार्यालयात असणा-या अपंग व्यक्तींच्या साधन साहित्य खरेदी करणे करीता खर्च करण्यांत येतो.

**मा.सौ.लोंढे मो.सं. :-** शहरातील अपंग असणा-या गरजू व्यक्तींना सदर निधी मधुन साहित्य देणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी. अपंगांकरीता असणा-या सायकली वाटप करणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** मा.शासन निर्णयात नमुद केलेल्या यादीनुसार अपंगांना साहित्य वाटप करणेत यावे.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** मलेरिया फवारणी बाबत दर्शविण्यांत आलेली तरतुद कमी करण्यांत यावी.

**आरोग्य वै. अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** मलेरिया फवारणी करीता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग कमी आहे. पावसाळयामध्ये फवारणी करीता ज्यादा कर्मचारी नेमुन फवारणी करावी लागते. यासाठी मोठया प्रमाणावर खर्च लागतो. केलेली तरतुद योग्य आहे.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** जलजन्य आजार, साथ रोग व संसर्ग जन्य रोग निवारणा करीता दर्शविण्यांत आलेली तरतुद रक्कम रु.१०.०० लाखाने कमी करण्यांत यावी.

**मा.सौ. शिंदे र.अ.:-** नवीन स्मशान भुमी सुधारणा अमरधाम करीता रू. १० लाखाची तरतुदीत वाढ करण्यांत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** रस्ते दुरुस्ती (पॅचिंग व मुरूम टाकणे) तरतुद रक्कम रु.५०.०० लाख ठेवण्यांत यावी. याची रक्कम ४० लाखाने कमी करण्यात यावी. कारण भविष्यामध्ये बरेचसे रस्ते शासकीय योजने व मनपा निधीमधून होणार आहेत.

**मा.श्री.जगताप नि. वि.:-** विकास भार निधी रक्कम रु.५०.०० लाखाने वाढविण्यांत यावा.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :-** विकास भारामधील ७५ टक्के निधी शासकीय नियमानुसार भुसंपादना करीता ठेवणे आवश्यक असते. त्यानुसार बजेट सादर करताना विकास भार या लेखाशिर्षावर ५० लक्ष रूपये पेक्षा जास्त रक्कम ठेवता येणार नाही.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. महेश डोईफोडे :-** नगररचना विभागाचे अधिकारी येथे उपस्थित नाही .श्री. सासवडकर यांना माहिती देता आलेली नाही. श्री. प्रभुणे बैठकीस उपस्थित राहणार होते अचानक अनुपस्थित राहिल्याने शो कॉज नोटीस काढणे बाबत प्र. नगरसचिव यांनी प्रस्ताव सादर करावा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** मा.महापौर चषक निधी रक्कम रु. २५.०० लाख करण्यांत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-**अतिक्रमण विभागाकरीता वाहन खरेदी करणे आवश्यक आहे का?अतिक्रमण विभागाकरीता महानगरपालिकेमार्फत भाडे तत्वावर गाडी उपलब्ध करुन देण्यांत येते.

**मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडमः-** अतिक्रमण विभागाकरीता स्वतंत्र वाहनांची आवश्यकता असल्याने वाहन खरेदी करणे योग्य आहे.

**मा.श्री.भोसले ग.पुं. :-** महानगरपालिके मार्फत चालविल्या जाणा-या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असतांना तेथिल शिक्षकांना काय काम आहे.

**प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण मंडळ -मा.श्री. धाडगे :-** मनपा शिक्षण मंडळाकडे काही शिक्षक रिटायर झालेले आहेत. त्यामुळे शिक्षक संख्या कमी आहे. त्यातच शिक्षण मंडळाने नविन तीन शाळा सुरु केलेल्या आहेत.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** मनपा शिक्षण मंडळामार्फत भाडयाने देण्यांत आलेल्या शाळांचे ५७.०० लाख भाडे येणे बाकी आहे. सदर भाडे वसुली कामी शाळांना सुट्टया असतांना सदर शाळांना सील करण्यांत यावे.

**मा.श्री.भोसले ग.पु./मा.श्री.सातपुते दि.ना.: -** नागरिकांना महानगरपालिकेच्या माध्यमातून सक्षम नागरी सुविधा मिळणे क्रमप्राप्त आहे. याकरिता रस्ते डांबरीकरण ,मजबुतीकरण, रूंदीकरण तसेच नविन ड्रेनेज लाईन टाकणे, बंद पाईप गटार करणे तसेच स्ट्रीट लाईट उभारणे तसेच ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसाठी उद्यान विकसीत करणे. नविन इमारत उभारणे, नुतनीकरण करणे याकरिता शहर उपनगर व वाढीव हद्द परिसर येथील गरजेच्या सर्व समावेशक कामांच्या प्रस्तावांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी **" शहर,उपनगर,हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा विकास कार्यक्रम"**असे लेखाशिर्ष निर्माण करून त्यामध्ये रक्कम रू.८ कोटी ५४ लाख तरतूद करण्यांत यावी.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** वॉर्ड विकास निधी रक्कम रु.३.५० कोटी करण्यांत यावे. अधिकारी निवासासाठी दर्शविण्यांत आलेली तरतुद आहे तीच ठेवण्यांत यावी. मा.महापौर शहर विकास निधी रक्कम रु.५.०० कोटी करण्यांत यावा. मा.उपमहापौर निधी रक्कम रु.३०.०० लाख करण्यांत यावा. चौक सुधारणा, रुंदीकरण रक्कम रु. ५.०० लाख तरतुद कमी करण्यांत यावी.

उद्यान विकास व तार कंपौड हा निधी रू.२५ लाखानी कमी करण्यात यावा.मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रक्कम रु.३०.०० लाख तरतुद करण्यांत यावी. सभापती महिला व बालकल्याण विकास निधी रक्कम रु.१५.०० लाख तरतुद करण्यांत यावी. उपसभापती महिला व बालकल्याण विकास निधी रक्कम रु.१५.०० लाख तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.भोसले ग.पुं. :-** बुरुडगांव व केडगांव विभागाकरीता नविन उद्यान विकसित करणे कामी रक्कम रु.५०.०० लाखाची तरतुद करण्यांत यावी.  वरद विनायक जीम आनंदीबाजार या ठिकाणी मशिनरी खरेदी करणे कामी रू. ५ लाखाची तरतूद करण्यात यावी.

**मा.श्री.डागवाले कि.आ. :-** थकीत देयके अदा करणे याकामी रक्कम रू. २० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या दृष्टिने थकीत देयके अदा करणे तरतूद रक्कम रू.१२ कोटीने कमी करून रू.८ कोटी चालू थकीत देयके अदा करण्यासाठी ठेवण्यात यावे. माळीवाडा परिसरातील कपिलेश्वर अद्यावत व्यायामशाळा साहित्य खरेदी करण्यासाठी रू.५ लाखाची तरतूद करण्यात यावी. क्रीडा साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर रू.१५ लाखाची तरतूद करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभेमध्ये चर्चा करून निर्णय घेतलेले असुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दुरूस्त्या फेरफार व शिफारशीसह सन २०११-२०१२ सालचे सुधारित सन २०१२-२०१३ सालचे बाबवार अंदाजपत्रक  मनपाचे स्कुल बोर्डाचे शेअर्ससह महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

--**--

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी नविन लेखाशिर्ष तयार करून त्यामध्ये आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्र.१** :- अग्निशमन विभाग- अग्निशमन सेवा शुल्क व अग्निशमन दल ना हरकत प्रमाणपत्र फी वाढविणेबाबत.

**प्रस्ताव क्र.२** :- अग्निशमन विभाग- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.३** :- वसुली विभाग- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणबाबत.

**प्रस्ताव क्र.४** :-वसुली विभाग- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम १८ (१) नुसार वृक्ष उपकराची आकरणीबाबत.

**प्रस्ताव क्र.५**:- वसुली विभाग- जललाभ कर व मललाभ कर आकारणीच्या सुधारणेबाबत.

**प्रस्ताव क्र.६** :- आरोग्य / कोंडवाडा विभाग- कोंडवाडा विभागाकडील कोंडावाडा केल्यानंतर आकारण्यात येणारे कोंडावाडा दरात वाढ करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.७** :- घनकचरा व्यवस्थापन विभाग- खाजगी सेप्टीक टँक सफाई सेवेचे खाजगीकरण करणेबाबत.

**या प्रस्तावास पुढिलप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.**

प्रस्ताव क्रमांक १ :- ऑफिस रिपोर्ट मंजूरीस शिफारस आहे.

प्रस्ताव क्रमांक २ :- करयोग्य मुल्याच्या १ टक्का अग्निशमन कर लागू करणेस शिफारस आहे.

प्रस्ताव क्रमांक ३ :- मालमत्ता ,नावनोंदणी फी यापूर्वी अर्धा टक्का वसुल करण्यात येत होता त्या ऐवजी एकूण एक टक्का वसुल करावी यासाठी शिफारस आहे.

प्रस्ताव क्रमांक ४ :- वृक्षकर अर्धा टक्का ऐवजी एक टक्का लागू करणेस शिफारस आहे.

प्रस्ताव क्रमांक ५ :- ऑफिस रिपोर्ट नियमाप्रमाणे मंजूरीस शिफारस आहे.

प्रस्ताव क्रमांक ६ :- प्रस्तावातील दर वाढ तक्ता मधील अनुक्रम नंबर १ व २ या बाबत ऑफिस रिपोर्ट नुसार कार्यवाही करणेस शिफारस आहे. तसेच अनुक्रम नं.३,४ व ५ या करिता ५० टक्के दर आकारण्यात यावे.

प्रस्ताव क्रमांक ७ :- सेप्टीक सफाईचे काम खर्चाच्या दृष्टिने मनपास परवडत नसल्याने सदरची सेवा खाजगी करणाच्या माध्यमातून सुरू करण्यासाठी ही सभा शिफारस करित आहे. मा.महासभेमध्ये खाजगीकरणाबाबत निर्णय झाल्यास पुढील कार्यवाही मा.स्थायी समितीकडे सविस्तर प्रस्ताव पाठवून निविदा मागविण्याबाबत कार्यवाही करावी.

तसेच

- घरगुती अर्धा इंची बेकायदेशीर नळ जोड बाब वसुली क्लार्क तसेच केअरटेकर यांनी सर्व्हे करून अशा बाबत दंडनीय कारवाई न करता  रक्कम रू. १५००/- या प्रमाणे त्वरीत बील देण्याबाबत व्यवस्था करावी. जेणे करून बेकायदेशीर नळ कनेक्शन धारकांची संख्या कमी होवून उत्पन्नात भर पडण्यास मदत होईल. मात्र पाउऱ्न इंची व त्यापुढील घरगुती व व्यवसायिक व वाणिज्य नळजोड धारक बेकायदेशीर कनेक्शन असल्यास त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करून योग्य ती कारवाई करावी. तसेच सदर योजनेचा लाभ माहे ३० जून २०१२ अखेर देण्यात यावी. तदनंतर या बाबत नळजोड नियमितीकरण अहवाल इकडेस सादर करावा व त्यानुसार योजना पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. याबाबतच्या कारवाईत कसूर झाल्यास त्याची जबाबदारी फिटर व्हॉलमन तसेच वसुली क्लार्क व प्रभाग अधिकारी यांचेवर जबाबदारी निहाय निश्चित करण्यात यावी.
- घरपट्टी वसुली बाबत उत्पन्न वाढीच्या दृष्टिने थकीत घरपट्टी वसुली करणेत यावी. तसेच मा.न्यायालया समोर असलेले वाद अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत महानगरपालिकेने पूर्वी लोक न्यायालयाद्वारे काही केसेस बाबत निपटारा केलेला आहे. अशा योजनेवर भर देवून सदर कामकाज प्रभावीपणे कार्यान्वीत करण्यात यावी.
- मालमत्ता फेर मुल्यांकन सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार सुरू करण्यास ही सभा शिफारस करित आहे. याबाबत उत्पन्नाच्या दृष्टिने प्रशासनाने कार्यवाही हाती घ्यावी. याकरिता लेखाशिर्षामध्ये तरतूद केल्यानुसार खर्च मान्यतेस शिफारस आहे.
- महिला व बाल कल्याण कार्यक्रम अंतर्गत असलेल्या लेखाशिर्षामधून खालील प्रमाणे नाविण्यपूर्ण तरतूदी करणेस ही सभा शिफारस करित आहे.

    १) केडगांव परिसर उपनगरासाठी अद्यावत प्रसुती रूग्णालय व बाल रूग्णालय इमारत बांधणे रू. १ कोटी

२) कै.बाळासाहेब देशपांडे प्रसुती रूग्णालय इमारत आवश्यकते नुसार नुतनीकरण नविन बांधकाम करणे. रू. १ कोटी

३) सावेडी उपनगरामध्ये महिलांकरिता अद्यावत जिम इमारत मशिनरीसह उभारणे रू. २५ लक्ष

४) बुरूडगांव रोड परिसर महिलांकरिता अद्यावत जिम इमारत मशिनरीसह उभारणे रू. २५ लक्ष

५) नविन शव वाहिनी रथ अद्यावत सुविधेसह नग -२ खरेदी करणे बाबत रू. २० लक्ष नविन शववाहिनी / अम्ब्युलन्स खरेदी करणे या लेखाशिर्षामधून सदरचा खर्च भागविण्यात यावा.

६) माळीवाडा परिसरातील कपिलेश्वर व्यायामशाळा व आनंदी बाजार येथील वरद विनायक व्यायामशाळा येथे अद्यावत मशिनरी खरेदी करणेकामी प्रत्येकी रू. ५ लाख या प्रमाणे रक्कम रू. १० लाख क्रीडा साहित्य खरेदी या लेखाशिर्षामधून खर्च भागविण्यात यावा.

७) अग्निशमन वाहन खरेदी करणे या तरतूदीमधून खरेदी करण्यात येणा-या वाहनापैकी एक वाहन केडगांव उपनगर परिसरासाठी देण्यात यावे.

८) अमरधाम स्मशानभूमि वास्तुविकासासाठी स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी या लेखाशिर्षामधून रू.१० लक्ष खर्च करण्यात यावा.

९) मनपा सभागृह नुतनीकरण करणे या लेखाशिर्षा मधून जुन्या सभागृहासह जुनी मनपा इमारत रंगरंगोटी डागडुजी करणे खर्चास मान्यता देणेकामी शिफारस आहे.

१०) महानगरपालिका मालकीचे माळीवाडा भागातील सौभाग्य सदन मंगलकार्यालयाचा जनावरे बांधण्यासाठी गोठा म्हणुन उपयोग केला जात आहे. महानगरपालिकेस त्यापासुन अपेक्षित उत्पन्न मिळू शकत नाही. याकरिता महानगरपालिकेच्या पॅनल आर्किटेक्ट यांचे पैकी एकाची नेमणुक करून नुतनी करणाचा प्लॅन एस्टीमेंटसह रिपोर्ट तयार करावा या कामाकरिता २ वर्षापुर्वी महासभेचे मंजुरी दिलेली आहे.

त्यामुळे वेगळया ठरावाची गरज नाही. परंतु त्याबाबत अद्याप पावेतो उत्पन्नाची बाब असुनही प्रशासनाने लक्ष दिले नाही त्वरीत प्रस्ताव तयार करावा.तसेच खाजगीकरणातुन घेणा-यास नुतनीकरणाच्या खर्चासह सदर मंगलकार्यालय खाजगी तत्वावर चालविण्यासाठी दिल्यास त्यापासुन उत्पन्न मिळू शकते. खाजगी तत्वावर देणे बाबत प्रस्ताव ठेवणे बाबत कार्यवाही करावी. अशी शिफारस आहे.

११) महानगरपालिका हद्दीत असणारे गाळे त्यांचे भाडे व हस्तांतरणा बाबत व त्यामध्ये असणारे पोट भाडेकरु यांचेबाबत अंदाजपत्रकामध्ये सन २०११-२०१२ चे मंजुरी देताना महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तातंरण करणेकामी रूपये १ लाख प्रती गाळा याप्रमाणे गाळे हस्तातंरण केल्यास फी घेण्याचा निर्णय घेणेत आला.त्यानुसार गेल्या वर्षात कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे उत्पन्न बुडत आहे. याबाबत तातडीने कामकाज सुरू करणेस ही सभा शिफारस करित आहे.

१२) नगररचनाकार यांचे मार्गदर्शनाखाली गुंठेवारी करणेकरीता स्वतंत्र विभाग तयार करणे बाबत आस्थापना विभागाने कार्यवाही करावी.

१३) नगर शहरात होणा-या विविध कार्यक्रमाकरिता अद्यावत सुविधेसह २ नग फिरते शौचालय युनिट खरेदी करणेस २० लक्ष रूपये तरतूद करणेस ही सभा शिफारस करित आहे. **" नविन फिरते शौचालय खरेदी करणे "** या लेखाशिर्षाचे निर्माण करून सदरच्या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

१४) **"शहर उपनगरे वाढीव हद्दीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम "** हे नविन लेखाशिर्ष तयार करून त्यामधून करण्यात यावा. तसेच सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे कामे करण्यात यावी. त्याकामी ढोबळ मानाने अंदाजे रक्कम रू. ८ कोटी ५४ लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

१५) **"सभापती व उपसभापती महिला व बाल कल्याण समिती"** यांना स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करून प्रत्येकी रू १५ लाख तरतूद करण्यात यावी.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०११-२०१२ सालचे सुधारित **व** सन २०१२-२०१३ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. किशोर आसाराम डागवाले सही /-

अनुमोदक :- मा.श्री. दत्तात्रय हरिभाऊ कावरे सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

**सही /-**
**(मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**अहमदनगर महानगरपालिका**

**सोबत** :- १) सन २०११-२०१२ सालचे सुधारित व सन २०१२-२०१३ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता
२) "शहर उपनगरे वाढीव हद्दीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम " या लेखाशिर्षातील कामांची यादी

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर |
|---|
| **मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१२-२०१३ चा अर्थसंकल्प** |
| |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१२)....................................................५५४१८२३१** |
| **एकुण जमा.........................................................................................२८७९३७०४००** |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.........................................................२९३४७८८६३१** |
| **एकुण खर्च........................................................................................ २८७८८७३०००** |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१३)...................................................५५९१५६३१** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४१४५००००० | ५२१००००० | | ४६६६००००० |
| २ | वृक्ष कर | ३५००००० | १८००००० | | ५३००००० |
| ३ | अग्निशमन कर | १००००० | ५२००००० | | ५३००००० |
| ४ | मालमत्ता नाव नोंदणी फी | ९८००००० | ५२००००० | | १५०००००० |
| ५ | गुंठेवारी विकास नियमित करणे | ४०००००० | १०००००० | | ५०००००० |
| ६ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ५००००० | ५००००० | | १०००००० |
| ७ | रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | १००००००० | ५०००००० | | १५०००००० |
| ८ | मललाभ कर | १३००००० | २५००००० | | ३८००००० |
| ९ | जललाभ कर | १३००००० | २५००००० | | ३८००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **४४५००००००** | **७५८०००००** | **०** | **५२०८०००००** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | विद्युत साहित्य खरेदी | ४०००००० | | १०००००० | ३०००००० |
| २ | सोलर पथदिवे दुरुस्ती | १०००००० | | ८००००० | २००००० |
| ३ | पेट्रोल, डिझेल | ८०००००० | | ३०००००० | ५०००००० |
| ४ | कंटेनर, कॉम्पेक्टर, डंपर प्लेसर खरेदी | ० | १५००००० | | १५००००० |
| ५ | जलजन्य आजार, साथ रोग व संसर्गजय आजार नियंत्रण | १२००००० | | २००००० | १०००००० |
| ६ | रस्ते दुरुस्ती (पॅचिंग़ व मुरुम टाकणे) | ९०००००० | | ४०००००० | ५०००००० |
| ७ | महापौर चषक स्पर्धा | १०००००० | १५००००० | | २५००००० |
| ८ | वॉर्ड विकास निधी | ० | ३५०००००० | | ३५०००००० |
| ९ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| १० | महापौर शहर विकास निधी | ० | ५०००००० | | ५०००००० |
| ११ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | ३०००००० | | ३०००००० |
| १२ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | ३०००००० | | ३०००००० |
| १३ | सभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १५००००० | | १५००००० |
| १४ | उपसभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १५००००० | | १५००००० |
| १५ | थकीत देयके अदा करणे | २०००००००० | | १०००००००० | १०००००००० |
| १६ | क्रीडा साहित्य खरेदी | २००००० | २३००००० | | २५००००० |
| १७ | शहर, उपनगर, हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम | ० | ८५४००००० | | ८५४००००० |
| १८ | प्रशासकीय इमारत सुरक्षा व्यवस्था | १०००००० | | ५००००० | ५००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | नविन फिरते शौचालय खरेदी | ० | २०००००० | | २०००००० |
| २० | चौक सुधारणा व रुंदीकरण | १०००००० | | ५००००० | ५००००० |
| २१ | उद्यान विकास व तार कंपौंड | ५०००००० | | २५००००० | २५००००० |
| २२ | नविन शववाहिनी / ॲम्ब्युलन्स खरेदी | १५००००० | ५००००० | | २०००००० |
| २२ | पोस्टेज | २००००० | | १८०००० | २०००० |
| २३ | प्रवासभत्ता देयके | २०००० | १८०००० | | २००००० |
| २४ | बॅरेकेटींग, मंडप उभारणे, रंगरंगोटी इ. खर्च | ८००००० | १००००० | | ९००००० |
| | | **२३४९२००००** | **१८८४८००००** | **११२६८००००** | **३१०७२००००** |

**स्वाक्षरी /-**
**(मा.सौ. अनिता राजेंद्र राठोड),**
**सभापती ,**
**स्थायी समिती,**
**अहमदनगर महानगरपालिका**

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा -२०१२-२०१३ अर्थ संकल्पामधील**

**" शहर, उपनगर ,हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा विकास कार्यक्रम "** या लेखा शिर्षातील कामे खालील प्रमाणे

| अ.नं. | कामाचे नांवे | रक्कम |
|---|---|---|
| १ | भूषणनगर येथील विविध भागात अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | २० लाख |
| २ | प्रभाग क्र.१० मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेबाबत. | १० लाख |
| ३ | प्रभाग क्र.३५ मध्ये संपदा बिल्डींग ते भैरवनाथ मंदिर ते वाउत्रे बिल्डींग ते अनिल ट्रेडर्स ते गणेश मंदिरापर्यत ३०० एमएम पाईप गटर व रस्ता कॉक्रीट करणे. | १४ लाख |
| ४ | प्रभाग क्र.१२मधील बोल्हेगांव फाटा परिसर,गणेश पार्क,भंडारी कॉलनी,सुविधा कॉलनी,सौरभ कॉलनी,गणेश चौक,परिसर इ.भागात अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र.३ मध्ये तपोवन रस्ता जरे घर ते सिताराम कजबे घर या दरम्यान ९०० मीटर रस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणेबाबत. | १५ लाख |
| ६ | प्रभाग क्र.६३ मध्ये आदर्शनगर, जय मल्हार नगर, गजानन नगर परिसरातील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरी करणे बाबत. | १५ लाख |
| ७ | प्रभाग क्र.१५ मध्ये रासने नगर, अमित बँक कॉलनी अंतर्गत रस्ते व सुशोभिकरण करणे तसेच देना बँक कॉलनी भागात सुशोभिकरण करणे बाबत. | ३० लाख |
| ८ | प्रभाग क्र.३७ मध्ये दिल्लीगेट पटांगण व परिसर सुशोभिकरण व रस्ते डांबरीकरण करणे बाबत. | १५ लाख |
| ९ | प्रभाग क्र.२७ मधील महालक्ष्मी प्लोअरमिल ते श्रीनाथ किराणा ते वांडेकर घर ते प्राणदा क्लेनिक ते अजिंक्यनगर ते शिवाजी बोरूडे घरापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | १५ लाख |
| १० | (सर्व्हे नं. ३८३ व ३८४ मधील भाग)मनपा हद्दीमधील बुरूडगांव रोड परिसर, भोसले आखाडा, माणिकनगर, स्टेशन परिसर आदी भागातून आलेली ड्रेनेज व सांडपाणी , बुरूडगाव रस्त्यावरील फुलसौंदर मळा परिसराच्या मुख्य ड्रेनेज लाईन आर.सी.सी. पाईप लाईन बंद गटर करणेबाबत | २५ लाख |
| ११ | प्रभाग क्र.५३ मधील स्वास्तिक चौक ते छत्रपती शिवाजी भाजी मार्केट ते आनंदधाम पर्यत रस्ता डांबरीकरण करणे रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणे , फुटपाथ व इलेक्ट्रीकची कामे इ. | २० लाख |
| १२ | प्रभाग क्र.२ मधील मनोज भंडारी सप्लायर्स व वाबळे घरापर्यत व जगदांबा क्लॉथ ते सिमला कॉलनी पर्यत रस्ता डांबरीकरण व डांबरीकरण , फुटपाथ व इलेक्ट्रीकची कामे करणे बाबत. | १५ लाख |

| | | |
|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र.१९ मधील सिव्हील हडको येथील साक्षी किराणा ते रेणुकामाता मंदिरापर्यत ४५० व ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटारीचे काम करणेबाबत | १० लाख |
| १४ | प्रभाग क्र. ६५ केडगाव अंबिकानगर येथील सारडा कॉलनी, सुवर्णानगर, मुळे कॉलनी मधील अंतर्गत भागांमध्ये बंद पाईप गटर करणे तसेच श्रीकृष्णनगर कॉलनीमध्ये रस्त्याचे खडीकरण करणे | १० लाख |
| १५ | प्रभाग क्र.२९ मधील बागरोजा मळा ते सिनानदीपर्यत बंद पाईप गटर करणे | १४ लाख |
| १६ | १]प्रभाग क्र.१७ मधील आहुजा किरणा ते प्रोफेसर कॉलनी चौक ते कलानगर ते सपकाळ हॉस्पीटलापर्यत रस्ता डांबरीकरण करणे<br>२] प्रभाग क्र. १७ मधील चैतन्यनगर प्रोफेसर कॉलनी सुयोग सोसायटी येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १० लाख<br>१० लाख |
| १७ | प्रभाग क्र.४३ मध्ये नवा मराठा प्रेस ते टायटन शोरूम पर्यत ड्रेनेज लाईन व रस्ता बांधणेचे | १५ लाख |
| १८ | प्रभाग क्र.३८ मधील दातरंगे मळा परिसर व वारूळाचा मारूती रस्ता मजबुतीकरण | १० लाख |
| १९ | प्रभाग क्र.१८ मधील सिव्हील हडको अंतर्गत बंद पाईप गटर करणेबाबत | १० लाख |
| २० | प्रभाग क्र.२३ मधील गडाखनाला, कपाटवाला नाला तसेच आर.टी.ओ. नाला हे चेंबर्स नाले करणेबाबत | १० लाख |
| २१ | प्रभाग क्र.३५ मध्ये सारडा विद्यालय ते महादेव कॉम्प्लेक्स पर्यत ६००एमएम पाईप गटर करणे | ११ लाख |
| २२ | प्रभाग क्र.२० मुकुंदनगर भागातील इरिगेशन गेट ते इस्माईली बेकरी ते दगडी चाळ पर्यत डांबरीकरण करणेबाबत | १० लाख |
| २३ | प्रभाग क्र.३४ मध्ये मिसाळ गल्ली येथील लक्ष्मण पवार घर ते दिपक रेडीमेड दुकान तसेच ॲक्सिसे बँक एटीम पर्यत सदर भागात नवीन कॉक्रीटीकरण करणेबाबत | १० लाख |
| २४ | प्रभाग क्र. २६ मध्ये भुतकरवाडी चौक ते नगर-मनमाड हायवे<br>रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १० लाख |
| २५ | १] प्रभाग क्र.४४ मधील गंजबाजार येथील भाजीमार्केट सुधारण्यात यावी. तसेच गंजबाजार ते रामचंद्र खुंटापर्यत डांबरीकरण करण्यात यावी.<br>२] प्रभाग क्र४४ मधील हातमपुरा चौक ते कोठी रोड पर्यत पथदिवे व रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे. | १० लाख<br>१० लाख |
| २६ | प्रभाग क्र.३५ मध्ये नेहरू मार्केट ते परदेसी गल्ली दरम्यान ३०० एमएम पाईप गटर व कॉक्रीट करणे. | १५ लाख |
| २७ | प्रभाग क्र. ४६ मधील माळीवाडा अंतर्गत भागामध्ये नविन ड्रेनेज लाईन करणेबाबत | २० लाख |

| | | |
|---|---|---|
| २८ | प्रभाग क्र.४० मध्ये नवले घर ते मारूती मंदिर , तांगेगल्ली कोपरा ते झारेकर गल्ली तुळजाभवानी मंदिरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे व पी.सी.सी.गटर करणे बाबत | १० लाख |
| २९ | प्रभाग क्र.४० मध्ये नवले घर ते मारूती मंदिर , तांगेगल्ली कोपरा ते झारेकर गल्ली तुळजाभवानी मंदिरापर्यत एनर्जी सेव्हिंग सेव्हर एल.डी.ई. फिटींग ५० नग बसविणे. | १० लाख |
| ३० | प्रभाग क्र.३५ मध्ये श्री मेडीकल ते विठ्ठल मंदिर दरम्यान ३०० एमएम पाईप गटर व कॉक्रीट करणे. | १२ लाख |
| ३१ | प्रभाग क्र. १८ मधील लॉर्ड बिशप कॉलनी अंतर्गत डांबरीकरण करणेबाबत | १० लाख |
| ३२ | प्रभाग क्र. ५ मधील नित्यसेवा हौसिंग सोसायटी ते औरंगाबाद रोड पर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण डांबरीकरण करणे | १० लाख |
| ३३ | प्रभाग क्र.३५ मध्ये रूचिरा कॉर्नर ते महादेव कॉम्प्लेक्स पर्यत ६००एमएम पाईप गटर करणे. | १२ लाख |
| ३४ | प्रभाग क्र. ५ मधील हॉटेल सनी पॅलेस ते तपोवन रोडपर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे. | १० लाख |
| ३५ | नगर कल्याण रोड वरील आदर्श नगर विद्या कॉलनी येथील ओपन स्पेस मध्ये उद्यान विकसीत , खेळणी बसविणे, जॉगिंग पार्क करणे | १० लाख |
| ३६ | प्रभाग क्र. ६० मधील सर्व्हे न ३६३ भिंगार व सर्व्हे नं. ५३ मधील महानगरपालिकेच्या मालकीचे ओपन स्पेस ला संरक्षक भिंत बांधणे. खेळणी बसविणे, व्यासपीठ तयार करणे, जॉगिंग ट्रॅक करणे, झाडे लावणे ,बोअरवेल घेणे इ. | २० लाख |
| ३७ | प्रभाग क्र. ५४ मध्ये आगरकर मळा येथे गड्डम घर ते औसरकर वीट भट्टी ते अशोक आगरकर घरापर्यत रस्ता रूंदीकरण, डांबरीकरण व सुशोभिकरण करणे | २० लाख |
| ३८ | प्रभाग क्र.४९ मधील पुनममोतीनगर भागामध्ये गांधी हॉस्पीटल ते राउत्त मळा येथील अंतर्गत भागामध्ये चैतन्य कॉलनी, नवजीवन कॉलनी , सिताबन कॉलनी , गुंदेचा बंगला, हुंडे बंगला ते नहार बंगल्यापर्यत रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १५ लाख |
| ३९ | मनपा हद्दीमधील मेहसूनी टेलर ते सोळातोटी कारंजा ते शितळादेवी मंदिरापर्यत ३०० एमएम पाईप गटर करणे. | ६ लाख |
| ४० | मनपा हद्दीमधील छाया टॉकीज ते कल्पेश बियर शॉपी ते गुरूकृपा क्लिनिक दरम्यान ३०० एमएम पाईप गटर व कॉक्रीट करणे. | ७ लाख |
| ४१ | मनपा हद्दीमधील श्री. नाथजी निवास ते महेसुनी टेलर ते सुराणा बिल्डींग ते मारूती मंदिरापर्यत ३०० एमएम पाईप गटर करणे. | १० लाख |
| ४२ | मनपा हद्दीमधील मराठ गल्ली अंतर्गत ते मारूती मंदिर ते सोळातोटी कारंजा ते गवांदे क्लासेस ते सम्राट इलेक्ट्रॉनिक पर्यत ३००एमएम पाईप गटर व रस्ता कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ४३ | प्रियदर्शन शॉपिंग कॉम्प्लेक्स ते सिताराम सारडा विद्यालय मागील बाजू ते नवरंग व्यायाम शाळा कोपरा मागील बाजूस बंद पाईप गटर करणे | ७५ लाख |
| ४४ | मनपा हद्दीतील नगर पुणे रोड चंदन इस्टेट ते ठाणेकर बंगला नगर पुणे रोड डांबरीकरण, मजबुतीकरण ,रूंदीकरण व स्ट्रीट लाईट उभारणे | ५० लाख |

| | | |
|---|---|---|
| ४५ | टिळक रोड, स्वास्तिक चौक ते आयुर्वेद कॉलेज कोपरा रस्ता डांबरीकरण करणे | १० लाख |
| ४६ | ग्राहक भंडार ते स्मिता मेडिकल ते तेलीखुंट पॉवर हाउत्स चौक रस्ता डांबरीकरण करणे | १५ लाख |
| ४७ | प्रभाग क्र.५१ मधील सारसपुल ते वेताळ चौक ते सावताचौक, कानडेमळा रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | ३० लाख |
| ४८ | प्र.क्र. ४१ मधील आनंदीबाजार येथील वरद विनायक जीमचे नुतनीकरण करणे | ५ लाख |
| ४९ | प्र.क्र. ५७ अंतर्गत नागरी सुविधा विकास कामे करणे | १० लाख |
| ५० | महेश चित्रमंदिर ते यशांजली हॉटेल ते जुने नवजीवन हॉस्पीटल कॉर्नर पर्यत रस्ता रूंदीकरणासह ,मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १५ लाख |
| ५१ | प्र.क्र. ५३ मध्ये बुरूडगांव विभागीय कार्यालय लगत मारूती मंदिर परिसर अंतर्गत बंद पाईप गटर करणे. | ३ लाख |
| ५२ | प्र.क्र. ८ मधील नरहरी नगर व समर्थ नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १० लाख |
| ५३ | प्र.क्र.१३ नागापूर गांधीनगर भागामध्ये रस्ता डांबरीकरण करणे | १० लाख |
| ५४ | प्र.क्र. ४७ मधील अंतर्गत नागरी सुविधेची कामे करणे | १० लाख |
| ५५ | प्र.क्र. ९ मध्ये मधुबन कॉलनी अंतर्गत अनुक्रमे ३०० ,४५० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणे | १० लाख |
| ५६ | गांधी मैदान इमारतीस रंग देणे तसेच परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉस बसविणे, स्ट्रीट लाईट उभारणे | १० लाख |
| ५७ | प्र.क्र.३९मधील आनंदीबाजार ते गाडगीळ पटांगण अमरधामपर्यत बंद पाईप गटर करणे | १० लाख |
| ५८ | प्र.क्र. २८ मधील विद्या कॉलनी मध्ये बंद पाईप गटर करणे. | १० लाख |

स्वाक्षरी /-
(मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका